



## गोष्ट क्र. ३०

प्रबोधिनीत शिकलेली सर्वच पद्ये खूप छान आहेत आणि मला आजही ती खूप आवडतात. प्रत्येक पद्यामधून शिकण्यासारखं खूप आहे. प्रशालेतील सर्व युवक–युवतींना माझे हेच सांगणे आहे, की जीवनात काम करत असताना कशाचीही भीती बाळगू नका. कोणतीही घटना, प्रसंग, व्यक्ती, यांना घाबरून जाऊन ठरवलेली गोष्ट करण्याचे थांबवू नका. अनेकदा अशा भीतीमुळे मुक्त संवाद होत नाही. स्वत:तील सर्व क्षमतांना आपण पूर्णपणे न्याय देऊ शकत नाही. मला अमुक जमेल का नाही, नाही जमले तर लोक काय म्हणतील हा विचार निरुपयोगी आहे. स्वत:शी प्रामाणिक रहा. (Be truthful to yourself) स्वधर्म असा शब्द आपण वापरतो तो मला खूप पटतो. माझा स्वधर्म काय आहे ? (What is my constitution ) मला काय करायला आवडते ? याचे मूल्यमापन व आत्मपरीक्षण प्रत्येकजण कळत–नकळत करतच असतो. त्यातूनच जे करायला आवडते ते करत राहणे गरजेचे आहे. त्यातूनच कर्माचा मार्ग सापडतो असा माझा अनुभव आहे. आपल्याला जे करावेसे वाटते त्या उद्दिष्टाच्या सिद्धीसाठी प्रयत्न करतानाचा प्रवास हा आनंददायक असायला हवा.

श्रुती पटवर्धन–निगुडकर
(१९८२–१९८८)



माझी मोठी बहीण पृथा आधीच प्रबोधिनीत होती. मी व माझी जुळी बहिण एकाच वर्षी म्हणजे १९८२ मध्ये प्रशालेत आलो. प्रबोधिनीत येणे हा एक वेगळा अनुभव होता. देवनागरीतून इंग्रजी शिकणे ही आजही लक्षात राहिलेली आठवण आहे. माझ्या इतर भावंडाचे शिक्षण इंग्रजी माध्यमांच्या शाळेतून झाले पण देवनागरीतून इंग्रजी शिकल्यामुळे माझेही इंग्रजी उत्तम झाले.

प्रशालेतील शिक्षणाच्या अनेक आठवणी आहेत पण त्यातील एक आठवण नक्कीच विशेष आहे. माझे वडील merchant navy मध्ये काम करत असल्याने त्यांच्या कामाचे स्वरूप सहा-आठ महिने जहाजावर आणि उरलेले महिने घरी असे असायचे. १९८३-८४मध्ये माझ्या आईने शाळेकडे अनुमती मागितली, की शाळेतून रजा घेऊन, मला व माझ्या बहिणीला घेऊन, वडिलांबरोबर दोन महिने जहाजावर जाता येईल का? आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे प्राचार्यांनी तशी अनुमतीही दिली. वडिलांबरोबर आम्ही पोर्तुगाल, ग्रीस अशा देशांचा प्रवास केला. अशी मुभा दुसऱ्या कोणत्या शाळेने दिली असती का?

मी आणि माझी बहीण खेळात पारंगत होतो. राज्य पातळीवर जिम्नॅस्टिक्स स्पर्धांमध्ये आम्ही सहभागी व्हायचो, त्याचा सराव महाराष्ट्र मंडळ, टिळक रोड येथे व्हायचा. त्यासाठी मला आणि माझ्या बहिणीला दलावर न येण्याचीही परवानगी मिळाली होती. शाळेत असताना प्रबोधिनी आणि मंडळ हा आमच्या अस्तित्वाचा सर्वात मोठा भाग होता.

आणखी एक अनुभव म्हणजे शिवापूर परिसरातील गावांमध्ये जाऊन विहिरी व बोअरवेलचे सर्वेक्षण करण्याचा. त्यावेळेस मी ८वीत होते, माझ्याबरोबर ५-६वीतल्या मुलींचा एक गट होता. स्वारगेटला जायचे, तिथून एस्. टी. ने गावात, तिथे जाऊन सरपंचांची भेट घ्यायची. आम्हाला गावात फिरून सर्व विहिरी आणि बोअरवेलला भेट द्यायची होती. विहिरींची माहिती - व्यास, पाण्याची पातळी, बोअरवेलची स्थिती इत्यादी मोजल्यानंतर आम्हाला दिलेला फॉर्म भरायला सांगितले होते. असे सर्वेक्षणाचे ते गटकार्य होते. आज त्या गटकार्याचा अचंबा वाटतो. माझी मुलगी आज पदवीचे शिक्षण घेते आहे. पालक म्हणून सर्वच पालकांना असते तशी काळजी आमच्या पालकांना देखील वाटली असावी. पण त्यावेळेस केवळ प्रबोधिनीच्या विश्वासावरच पालकांनी आम्हाला या उपक्रमात सहभागी होऊ दिले. या शिकवणींमुळे मला माझ्या स्वतःच्या मुलीचे संगोपन करण्यात आणि अध्यापन व्यवसायात मदत झाली. आपण मुलांवर विश्वास ठेवल्यास ते जबाबदार होतात आणि ते प्रत्यक्षात मोठी कामे करू शकतात.

राखी विक्रीचा ही असाच वेगळा अनुभव. सुरुवातीला मला हा उपक्रम इतका आवडायचा नाही. विक्री कशासाठी, लोकांना का भेटायचे, पैसे कसे मागायचे इ. संकोच होता. पण नंतर लक्षात आले, की कोणतेही काम लहान अथवा मोठे असे नसते. अशा अनेक अनुभवांमधून जणू काही आमच्या मनाची मशागत झाली आणि पाऊस पडल्यावर जसे जमिनीत पाणी मुरते, तसे या सगळ्या अनुभवांनी आमचे अनुभवविश्व समृद्ध झाले. त्या वेळी छोट्या व कमी महत्त्वाच्या वाटणाऱ्या गोष्टींकडे मागे वळून पाहताना किती महत्त्वाचे संस्कार आमच्यावर बिंबवले गेले हे जाणवतं.

शनिवारी प्रबोधिनीचे आणि प्रशालेचे रूपच बदलून जायचे. आपल्या प्रशालेत फक्त शनिवारी गणवेश आणि इतर दिवशी मुक्तवेश असायचा. त्या दिवसांचे अनुभव आजही शब्दांमध्ये मांडणे खूप अवघड आहे. सकाळची प्रशाला, सर्वजण गणवेशात, प्रवेश केल्यावर कपाळावर किंवा हातावर गंध, मग उपासना आणि उपासनेनंतर वर्गात जाईपर्यंत पूर्ण मौन हे सर्व अनुभव अचाट होते. सुरुवातीच्या वर्षांत, इयत्ता पाचवी व सहावीत उपासना म्हणलं की आम्ही मुली एकमेकींकडे खाणाखुणा करायचो. परंतु, कालांतराने आम्ही विस्तारित उपासना करण्याची संधी मिळविण्यासाठी आठवीत जाण्याची वाट पाहू लागलो. एका जागी शांतपणे ४०-४५ मिनिटे सलग बसण्याचे ते प्रशिक्षण किती महत्त्वाचे होते ते आज पदोपदी जाणवते. तसेच अभ्यासिकेत सलग मौनाभ्यास करण्याचे. तेव्हा मौन पाळण्याची कडक शिस्त होती पण त्यातून निर्माण झालेली स्वयंशिस्त अतिशय महत्त्वाची होती. अशा अनेक अनुभवांतून आम्ही शिकत गेलो. छोटे वर्ग, २५-३० मुलं यामुळे सर्वच शिक्षकांबरोबर व्यक्तिगत पातळीवर खूप जवळ असायचो त्याचा ही खूप फायदा झाला. यातूनच एक समृद्ध व्यक्तिमत्त्व तयार झालं असं आज वाटतं. आज experiencial learning - अनुभवातून शिक्षण अशी पेडागॉगी आग्रहाने मांडली जाते. त्याकाळी १९९०च्या दशकात आम्हाला हे सर्व अनुभवायला मिळाले.

**अविरत विद्याव्रत**

आपल्या दीक्षाग्रहण उपासनेत आपण विद्याव्रताचे आचरण करू असा संकल्प करतो. हे स्वतःला दिले गेलेले सूक्ष्म वचन आहे. माझ्याबाबतीत म्हणायचे झाले तर मी अविरत विद्यार्थिनीच आहे. अगदी १०वी पूर्ण झाल्यापासून ते पीएच्. डी. पूर्ण होईपर्यंत! हा माझा प्रवास इतका समृद्ध होईल अशी मी कधी कल्पनाही केली नव्हती. इ.१०वी नंतर मी एक दोन महिने हॉटेल मॅनेजमेंटच्या पदविकेला प्रवेश घेतला पण माझ्या बहिणीकडून मला कळले की अभिनव कला महाविद्यालयात आता पाच वर्षांचा सरकारमान्य डिप्लोमा हा अभ्यासक्रम सुरू झाला आहे. अभिनव महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर माझ्या आयुष्याला एक वेगळेच सुंदर वळण मिळाले. मी १९९४साली हा डिप्लोमा पूर्ण केला. पण मनात आले की पुढे आणखी काही शिकायचे असेल तर पदवी हवी. नुसता डिप्लोमा पुरणार नाही. म्हणूनच मी तातडीने १२वीची परीक्षा बहिस्थ पद्धतीने दिली. एकीकडे अभिनव कला महाविद्यालयातून पाच वर्षे डिप्लोमा पूर्ण केल्यानंतर द एलिफंट डिझाइन प्रायव्हेट लिमिटेड या नावाजलेल्या कंपनीत कामाला सुरुवात केली. हे करत असताना मला कळले की माझ्या डिप्लोमानंतर मी एम्.ए. ड्रॉइंग आणि पेंटिंगमध्ये प्रवेश घेऊ शकते. माझ्या मुलीच्या जन्माच्या वेळेस मी अगदी आठव्या महिन्यापर्यंत नोकरी करत होते व त्यावेळी मी स्वतःचं एम.ए. पूर्ण केले.




माझी अध्यापन कौशल्ये वाढविण्यासाठी मी डिप्लोमा इन आर्ट एज्युकेशन पूर्ण केले आणि नंतर मी द्वितीय पदव्युत्तर पदवी घेतली. यावेळी मी एम्एफ्ए (ॲप्लाइड आर्टस्) पूर्ण केले. मी २०१२मध्ये व्हिज्युअल आर्टस्मध्ये यूजीसी नेट क्लीयर केले आणि व्हिज्युअल आर्टस्मध्ये पीएच्.डी. साठी एस्.एन्.डी.टी. युनिव्हर्सिटी, मुंबई मध्ये नोंदणी केली. मी २०१९मध्ये समकालीन व्हिज्युअल आर्टस् मधील रूपक या विषयासह पीएच्.डी. पूर्ण केली.

आमचं छोटसं कुटुंब. आई-बाबा, सासू-सासरे त्यांच्या व्यापात. त्यामुळे मी माझा नवरा व माझी मुलगी, असे माझे छोटे कुटुंब होते. दरम्यान, मी कोरल ड्रॉ, पेजमेकर, फ्लॅशसारखी सॉफ्टवेअर शिकले. C, C+ या संगणकाच्या भाषाही शिकले. माझ्या मुलीच्या जन्मानंतर मी दोन वर्षांसाठी सॉफ्टवेअरचे वर्ग घेतले. २००२मध्ये मी भारती विद्यापीठामध्ये कला महाविद्यालयात साहाय्यक प्राध्यापक म्हणून रूजू झाले.

मी बीएफ्ए (ॲप्लाइड आर्टस्) प्रोग्रॅम शिकवण्यास सुरुवात केली. कालांतराने मी असोसिएट प्रोफेसर झाले आणि त्यात माझी अठरा वर्षांची कारकीर्द झाली. वारंवार माझ्या विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. असे प्रतिसाद ऐकल्यानंतर प्रबोधिनीतील शिक्षकांची आठवण येते, कारण एखाद्या शिक्षकाने स्वत: कसे शिकावे हे देखील शिकवले पाहिजे. मी नेहमीच अध्यापनाच्या मार्गांवर विविध प्रयोग केले आहेत. एकीकडे माझा स्वतंत्र व्यवसायही मी सुरू ठेवला आहे. मी ब्रँडिंग आणि व्हिज्युअल कम्युनिकेशन डिझाइन क्षेत्रात व्यापकपणे काम केले आहे. मी आता एक तज्ज्ञ अनुभवी म्हणून डिझाइन शिकवते. मी १९९७पर्यंत मार्ग तंत्रज्ञानासाठी काम करताना, गोपीनाथजी मुंडे यांच्यासाठी प्रथम वेबसाइट डिझाइन केली होती. १९९६-९७च्या काळात एखाद्या राजकीय नेत्याची वेबसाइट असणे ही अत्यंत नाविन्याची गोष्ट होती.







**माझ्या विद्यार्थ्यांसाठी काही प्रायोगिक उपक्रम**

## शिक्षणातून अंतर्मनाकडे खोलवर प्रवास

लहानपणी मी अनेक बाह्य गोष्टींबद्दल भारावून जात असे. लहानपणापासूनच मला आत्मपरीक्षण करण्याची सवय लागली आहे. आज मी स्वतःकडे खोलवर डोकावून पाहू शकते. प्रबोधिनीत माझ्या विचारांना आणखी परिष्कृत केले गेले. शाळेत उपासना करताना शिकलेल्या गायत्री मंत्र, श्री सूक्त, पुरुष सूक्त, गीता इत्यादी गोष्टी कायमच बॅकग्राऊंडला राहिल्या. शाळेत असताना अद्वैत तत्त्वज्ञानाबद्दलही ऐकले होते. शैक्षणिक विषयांबरोबर ज्योतिष, संमोहन, संगीत इ. विषयांची मला गोडी लागली. विविध प्रकारचे औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षण पूर्ण करत असताना या सर्व प्रक्रिया आज एकाच बिंदूवर एकत्र होतात असे मला जाणवते. जरी विषयामध्ये बाह्यतः वैविध्य असेल तरी एक शिक्षक म्हणून हे सर्व विचार एकत्रित अद्वैत रूपातच समोर येताना दिसतात. अगदी कलाविषयात शिक्षण घेतानाही, शिक्षणाचे मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र असे सगळे आयाम कोठेतरी एकसंधपणे मला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवतात, मला आणखी समृद्ध करतात असे मला जाणवले. अविरत विद्यार्थी राहून विद्याव्रताचे हे वाण मला अधिकच खोलवर घेऊन जाते.



माझे हे सर्व शिक्षण अनेकवर्षं चालू ठेवताना मला खूप आनंद मिळत होता. कधीही तो अनुभव ताणाचा किंवा कष्टाचा वाटला नाही. मी त्यात पूर्ण उतरले. वरवरचा दृष्टिकोन ठेवून काहीही करायचे नाही असे ठरवले. हो, वेळेची कसरत व्हायची. माझा व्यवसाय, माझं कुटुंब, मुलगी – तिच्या शाळेच्या व अन्य दिनक्रमातील वेळा सांभाळणे असे आव्हानात्मक वेळापत्रक असायचे. माझ्या बऱ्याच मैत्रिणींना वाटते की मला हे कसे काय जमले? अनेकवेळा माझ्या मुलीला नाचाच्या क्लासला सोडले की क्लास बाहेर मी अभ्यास करत बसायचे. माझ्या अखंड शिक्षणाचे श्रेय मी माझ्या नवऱ्याला देते. त्याने मला कायम मदतच केली. एखादी गोष्ट करू नको असं त्याने कधीच म्हणले नाही.

## नृत्य का विज्ञान? गणित का चित्रकला?



आपल्या शिक्षणात आजही कला हा विषय गंभीरपणे घेतला जात नाही. गणिताला चित्रकला हा पर्याय असू शकतो असा विचार आपण करत नाही. भौतिक शास्त्राला नृत्य हा पर्याय आपल्याला दिसत नाही. कला ही कायमच खालच्या दर्जाची समजली जाते. त्याचा उल्लेख परिचय पत्रात, resume मध्ये सर्वात शेवटी तोंडी लावल्यासारखा करतात. कला आणि विज्ञान यांच्यात पूल बांधणे महत्त्वाचे आहे. आता खरंतर सर्व काही बदलले आहे, ग्राफिक आणि व्हिज्युअल डिझाइनर्ससाठी खूप मोठी मागणी वाढली आहे. बीएफ़ए (ॲप्लाइड आर्ट्स) पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांना उच्च-मोबदला देणाऱ्या करियरच्या संधी उपलब्ध आहेत. कलाक्षेत्रात नवीन दालने उघडत आहेत. ॲप्लाइड आर्ट्स आणि डिझाइनमध्ये वाढणाऱ्या संधींमुळे आज विद्यार्थी व्हिज्युअल आर्टमधून विविध प्रोफेशनला जात आहेत आणि अभियंत्यांपेक्षा अधिक पैसे कमवू शकतात.





सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विश्वकर्मा विद्यापीठ या सारख्या विद्यापीठांच्या अभ्यास मंडळावर मी सदस्य म्हणून काम केले आहे. तिथे काम करत असताना हे सर्व अभ्यासक्रम अद्ययावत व बहुढंगी कसे होतील असा माझा सतत विचार चालू असतो. आपल्याकडे आपण सतत काही सीमारेषा तयार केलेल्या आहेत. आपल्याला द्वैत संकल्पनेची सवय आहे. आपण त्यापलीकडे वाढणे आवश्यक आहे. पण या पलीकडे जाऊन खरे ज्ञान अद्वैत असते हा अनुभव घेणं सर्वच क्षेत्रात आवश्यक आहे. आणि म्हणूनच अभ्यासक्रमाच्या नियोजनात मी नेहमीच आंतरशास्त्रीय दृष्टिकोन वापरण्याचा प्रयत्न केला आहे.

दीड वर्षांपूर्वी झूमसारख्या प्लॅटफॉर्मवर आपण सहज संवाद साधू शकू अशी कोणाला कल्पना तरी होती का? आम्हाला कोरोना साथीच्या आजारामुळे काही चांगल्या गोष्टी शिकायला मिळाल्या आहेत. संवादाची ही नवी पद्धत त्याच्या फायद्या-तोट्यांसह आपल्या अंगवळणी पडली. झूमसारख्या माध्यमांतून संवाद साधताना मी अनेकदा माया या संकल्पनेचा विचार करते. आज सर्वत्र व्हर्च्युअल रिॲलिटी, ऑगमेंट रिॲलिटीची भाषा प्रचलित होताना दिसते आहे. तंत्रज्ञानाच्या प्रचंड वाढत्या वेगामुळे येत्या २०-२५ वर्षांत आपल्याला सत्य आणि असत्य, खरे आणि आभासी काय हे सांगणे जास्त अवघड होणार आहे. आणि मग मला वाटतं की भारतीय तत्त्वज्ञानामध्ये प्रस्तावित माया या संकल्पनेची पुन्हा भेट घेणे खूप मनोरंजक असेल. दुर्दैवाने आपल्या समाजाच्या मनावर इंग्रज व अन्य आक्रमकांनी सांगितलेल्या दृष्टीकोनाचा पगडा अजूनही खूप मोठा आहे. त्यामुळे पाश्चिमात्य कला विचाराकडे पाहताना आपण भारतातील स्वयंभू दृष्टीकोन विसरलो आहोत. भारतीय विचारांमधील समग्रता आपल्याला पुन्हा अनुभवावी लागेल.

### कर्मातच ज्ञानाचे सार्थक

प्रबोधिनीत शिकलेली सर्वच पद्ये खूप छान आहेत आणि मला आजही ती खूप आवडतात. प्रत्येक पद्यामधून शिकण्यासारखं खूप आहे. प्रशालेतील सर्व युवक-युवतींना माझे हेच सांगणे आहे, की जीवनात काम करत असताना कशाचीही भीती बाळगू नका. कोणतीही घटना, प्रसंग, व्यक्ती, यांना घाबरून जाऊन ठरवलेली गोष्ट करण्याचे थांबवू नका. अनेकदा अशा भीतीमुळे मुक्त संवाद होत नाही. स्वतःतील सर्व क्षमतांना आपण पूर्णपणे न्याय देऊ शकत नाही. मला अमुक जमेल का नाही, नाही जमले तर लोक काय म्हणतील हा विचार निरुपयोगी आहे. स्वतःशी प्रामाणिक रहा. (Be truthful to yourself) स्वधर्म असा शब्द आपण वापरतो तो मला खूप पटतो. माझा स्वधर्म काय आहे ? (What is my constitution) मला काय करायला आवडते ? याचे मूल्यमापन व आत्मपरीक्षण प्रत्येकजण कळत-नकळत करतच असतो. त्यातूनच जे करायला आवडते ते करत राहणे गरजेचे आहे. त्यातूनच कर्माचा मार्ग सापडतो असा माझा अनुभव आहे. आपल्याला जे करावेसे वाटते त्या उद्दिष्टाच्या सिद्धीसाठी प्रयत्न करतानाचा प्रवास हा आनंददायक असायला हवा.







मला शिकवणे आवडते. ही आवड आहे हे खूप पूर्वी लक्षात आले होते. वर्गात विद्यार्थांशी संवाद साधताना मी रंगून जाते. २०१२पासून मी पदव्युत्तर विद्यार्थ्यांना शिकवण्याचे काम करते आहे. सध्या कोथरूड येथील एम्.आय.टी. स्कूल ऑफ फाईन आर्टस्‌मध्ये हेड ऑफ द स्कूल म्हणून कार्यरत आहे. तिथे बी.एफ.ए. (ॲप्लाइड आर्ट्स) आणि एम.एफ.ए. (ॲप्लाइड आर्ट्स) हे प्रोग्रॅम सुरू केले आहेत. नजिकच्या भविष्यात व्हिज्युअल आर्टस्‌मध्ये आम्ही पीएच्.डी. सुरू करत आहोत. या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थी जाहिरात, ब्रँडिंग, ई-लर्निंग, यूआय. यूएक्स. इत्यादीमध्ये आकर्षक करिअर करू शकतात. आज पुण्यासारख्या शहरात अक्षरशः मध्यवस्तीत हे उत्तम अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी उपलब्ध आहेत.



दररोज संध्याकाळी मला मोकळ्या टेकडीवर चालत फिरायला खूप आवडते. निसर्गाच्या जवळ गेल्यावर माझा दिवस आणखीनच चैतन्यमयी होतो. दुर्दैवाने गेल्या वर्षी कोणत्या तरी विकास कामासाठी ४०-५० वर्षे जुनी असलेली झाडे तोडण्यात आली. अशी झाडे तोडली जातात याचेच मला दु:ख आहे. मी माझ्या परीने याचा निषेध नोंदवण्याचा प्रयत्न केला होता पण तोड व्हायची ती झालीच. ती रूखरूख कायम माझ्या मनात राहिली. माणसांप्रमाणे प्राणी, झाडे आणि इतर जीव यांना पण आपण सहानुभूतीने पाहिले पाहिजे असं मला वाटतं.

माझ्या आजपर्यंतच्या प्रवासात अनेकांकडून मला शिकता आले. पण त्यात पहिले स्थान माझ्या आई-वडिलांना देईन. आम्हा चार बहिणींना वाढवताना आईकडून अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. मुलगा-मुलगी असा भेद मला कधीच जाणवला नाही. घरातील सगळी कामे आम्ही चार बहिणी करायचो. माझ्या आईने बरीच सामाजिक कामे केली. १९७९-८० मध्ये माझ्या आईने नऊ वर्षांची मुलगी अनौपचारिकरित्या दत्तक घेतली. तिला आमची बहीण म्हणून आमच्याकडे राहायला आणले होते. तिच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली. तिने तिच्या शिक्षणाची, वाढीची आणि लग्नाचीही जबाबदारी घेतली. आज त्या बहिणीची स्वतःची नातवंडे आहेत. यानंतर ती थांबली नाही. हे कर्तव्य पार पाडल्यानंतर तिने आणखी एक मुलगी दत्तक घेतली. आणि तिला पण शिकवून लग्न लावून दिले. तिने सामाजिक कार्याकडे पाहण्याचा आमचा दृष्टिकोन बदलला. तिने आपल्या कृतीतून आम्हाला खूप काही शिकवले. आजही त्या दोघी बहिणी म्हणून आमच्या कुटुंबातील एक भाग आहेत.

प्रबोधिनीत शिकण्याचे जसे काही फायदे असतात तसे काही तोटेही आहेत, जगात फक्त आदर्शवादी राहून चालत नाही. व्यावहारिक ज्ञानही महत्त्वाचे असते. आपण जशी कल्पना करतो तसेच सगळे लोक नसतात. हे व्यावहारिक ज्ञान मला खूप नंतर नोकरीत मिळाले. माझ्या तीनही बहिणी आणि मोठे मेहुणे, माझा नवरा आणि मुलगी यांचा माझ्या यशात खूप मोठा वाटा आहे.







कॅप्टन सुरेश पटवर्धन यांचे शुक्रवार, दि. २३ जुलै रोजी वृद्धापकाळाने दुखःद निधन झाले, त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.



## RAPID FIRE

१. आवडते पुस्तक- The Secret

२. आवडता चित्रपट- Welcome

३. आवडता कलाकार- नसरुद्दिन शहा

४. आवडती कला - वारली, मधुबनी, रांगोळी

५. पहिली प्रतिक्रिया

- कलाकार- Value to our culture
- ज्ञान प्रबोधिनी- I Love my school.

**श्रुती पटवर्धन-निगुडकर**
**9850084896**
**nigudkarshruti@gmail.com**

**मुलाखत - चिन्मयी खरे, अपूर्वा इनामदार शब्दांकन - चिन्मयी खरे**

**संपादन - मानसी बोडस, पल्लवी गोखले - नगरकर**

**आरेखन व मांडणी - निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org